हिंगोली

दिनांक :– १०.०५.२०२४

## प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक दिपक हरिदास पाटील, वय ३६ वर्षे, व्यवसाय नौकरी पद –पोलीस शिपाई ने.सायबर सेल, पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली रा.रामाकृष्णा सिटी,बळसोंड,हिंगोली ता.जि.हिंगोली यांनी २०,०००/–रू. लाचेची मागणी करून तोडजोड अंती दिनांक २२.०४.२०२३ रोजी फोन पे व्दारे ५,०००/–रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्याचे विरूध्द पोस्टे हिंगोली शहर. जि.हिंगोली येथे गुन्हा दाखल .**

---

यातील तक्रारदार यांनी दि.३१.०८.२०२३ रोजी पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड येथे तक्रारी अर्ज दिली होता की,तक्रारदार हे मार्च २०२३ मध्ये हिंगोली ते सायाळा गावाकडे जात असतांना त्यांना गारमाळ उड्डाणपुला जवळ एक मोबाईल सापडला होता, तो मोबाईल तक्रारदार यांनी घरी घेवुन गेले व त्यामध्ये त्याचे मेव्हणे गजानन मस्के यांचे नावाने असलेले सिमकार्ड सदर मोबाईलमध्ये टाकुन वापरत होते, त्यानंतर दि.२२.०४.२०२३ रोजी तक्रारदार यांना हिंगोली येथील पोलीस दिपक पाटील यांचा फोन आला व त्यांनी सापडलेला मोबाईल घेवुन सायबर सेल ऑफीस हिंगोली येथे घेवुन या असे म्हणाले.त्यावरून तक्रारदार यांनी सदरचा मोबाईल घेवुन त्यांचेकडे गेले असता दिपक पाटील यांनी तक्रारदार यांस तुझ्याकडे तो मोबाईल कसा काय आला? असे विचारले असता तक्रारदार यांनी वरील प्रमाणे हकीकत सांगितली,त्यावर सायबर सेलचे पोलीस दिपक पाटील म्हणाले की, तो मोबाईल जमा कर,तसेच तुझ्यावर गुन्हा दाखल करायचा नसेल तर २०,०००/–रुपये दे असे म्हणाले असता,तक्रारदार यांनी एवढे पैसे माझ्याकडे नसल्याचे सांगितले,तेव्हा सायबर सेलचे पोलीस दिपक पाटील यांनी तडजोड अंती ५,०००/–रूपये घेण्याचे मान्य करून दि.२२.०४.२०२३ रोजी ११.५६ वा.सुमारास तक्रारदार यांनी त्यांचे फोन पे व्दारे पोलीस दिपक पाटील यांचे फोन पे ला ५,०००/–रु.पाठवुन दिले तसेच तक्रारदार यांना सापडलेला मोबाईल पोलीस दिपक पाटील यांचेकडे जमा केला,परंतु फोन पे व्दारे दिपक पाटील यांना दिलेले ५,०००/–रुपये हे लाचेची रक्कम असल्याचे त्यांना नंतर समजल्याने त्यांनी नमुद तक्रारी अर्ज केला होता.

सदर अर्ज चौकशी अहवालावरून नमुद आलोसे यांनी फोन पे व्दारे ५,०००/–रुपये स्विकारून स्वत: चा अर्थिक फायदा करून घेतला आहे म्हणुन आलोसे यांचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोली शहर गु.र.न. ३०३/२०२४ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास करणे चालु आहे.

नमुद गुन्हयातील आलोसे यांना मा.न्यायालयासमक्ष हजर केले असता मा.न्यायालयाने त्यास दि.२४.०५.२०२४ पर्यत न्यायालयीन कोठडी सुनावली असुन आलोसे याची परभणी कारागृह येथे रवानगी केली आहे.

सदरची कामगिरी डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके यांचे मार्गदर्शना खाली,श्री. प्रफुल्ल अंकुशकर, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**डॉ. राजकुमार शिंदे पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.नं. ९६२३९९९९४४**

**श्री.अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक, मो.नं.९८७०२२१३७९, टोल फ्री क्र.–१०६४,**

**दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५**

**अनिल ब. कटके**

**पोलीस उप अधिक्षक**